१ ते १५ ऑगस्ट २०२१ । किंमत २५ रु.
(एकूण पृष्ठे ५२)

# परिवर्तनाचा वाटसरु



के. आर. गौरी अम्मा
१९१९-२०२१

## अविरत संघर्षाच्या वाटसरू

अ
नु
क्र
म


संपादकीय

देवेंद्र इंगळे ५

समसामायिक



गौरी अम्मा : अविरत संघर्षाच्या प्रतीक ७

वैशाली पवार

संशोधन

पितृसत्ताक व्यवस्थेतील जगण्याचे आव्हान १७

प्रवीण घुन्नर

महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाची खाजगी वाट २५

मधुरा जोशी

झरोका

पुरुषप्रधानतेशी अशीही हातमिळवणी ३६

श्रुती वाघमोडे

वेचक वेधक

१० जून आणि नारायण मेघाजी लोखंडे ४२

अवधूत डोंगरे

नाट्यचर्चा

यशोधरा : प्रत्ययक्षम नाट्यानुभव ४६

दत्ता भगत

कविता

प्रदीप पुरंदरे ५०


अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



'भारतात इस्ल
अडकू नये
आहे. देशात
मनात भय उत
निर्माण केले गे
राष्ट्रवादाचे मो
सांस्कृतिक रा
परधर्मसंस्कृती
आहे. आर.
आणि भारता
चालविलेला
देशात कोणत्य
तर संकुचित
उपयोग करून
मोठा धोका
भारताचा
हिंदू-मुस्लीम
त्या बरोबरच
सौहार्दाचा दी
महत्त्वाचा आ
कारणांमुळे घ
सामान्य लोकां
समन्वयास बा
मुस्लिमांसमोर
हिंदूंसमोर मुस्
दोन्ही बाजूच्य
आपापल्या अ

# गौरी अम्मा : अविरत संघर्षाच्या वाटसरू

वैशाली पवार

केरळ परिवर्तनाच्या राजकारणासाठी प्रसिद्ध आहे. अशा राजकारणाच्या इतिहासात अनेक कृतिशील व्यक्ती होऊन गेल्या. त्यांनी राजकीय, सामाजिक परिस्थितीला आकार दिला. उत्पादन पद्धती समजून घेतल्या. त्यांनी उत्पादन शक्ती व उत्पादन संबंधाना आकार दिला. त्यांनी राजकारण परिवर्तनवादी घडवण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी गौरी अम्मा एक बिनीच्या नेत्या होत्या (१४ जुलै १९१९ ते ११ मे २०२१) (Jam Paul A., The Hindu, 11 May 2021). विशेष म्हणजे त्यांनी स्वातंत्र्योत्तर काळापासून थेट समकालीन काळापर्यंत राजकारण केले. कारण गौरी अम्मा यांना एक शतकापेक्षा जास्त आयुष्य लाभले (१०२ वर्ष). त्यामुळे काळाच्या संदर्भात मोठ्या पटावर त्यांना आपला प्रभाव उमटवता आला. केवळ मार्क्सवादी नव्हे तर संपूर्ण भारतीय राजकारणातील एक कृतिशील व्यक्तिमत्व म्हणून गौरी अम्मा यांच्या व्यक्तिमत्वाकडे पाहता येते. त्यांचे राजकारण मार्क्सवादी व स्त्रीवादी होते. त्यांच्या राजकारणाचे एकूण चार टप्पे पडतात. एक, गौरी अम्मा या भारत छोडो चळवळीतील एक कार्यकर्त्या होत्या (१९४२). त्यांनी वसाहतवाद विरोधी वैचारिक भूमिका घेतली होती. दोन, मार्क्सवादी चळवळ आणि पक्षातील राजकारण हा त्यांच्या जीवनातील दुसरा टप्पा होता. या टप्प्याला सुरुवात १९३८पासून झाली होती. परंतु १९४६-४७मध्ये त्यांनी मार्क्सवादी पक्षाचे सदस्यत्व स्वीकारले. त्या शेतकरी व कामगार संघटनांमध्ये कृतिशील होत्या (Trade Union and Peasant Movement). तीन, तिसऱ्या टप्प्यात त्यांनी पक्षांतर्गत सत्तासंघर्ष केला. त्याकाळात त्या केरळ कृषक संग्राम (१९६०-१९८४), केरळा महिला संग्राम (१९६७-१९७६) या संघटनांच्या त्या अध्यक्षा होत्या. विशेष १९७६-१९८७ या काळात त्या पक्षाच्या सेक्रेटरी होत्या. पुरुषसत्ता आणि स्त्रियांची सत्तेतील भागीदारी असा हा राजकीय संघर्षाचा टप्पा होता (१९६०-१९९०) चार, नव्वदीनंतर त्यांनी स्वतंत्र राजकारणाची वाटचाल सुरू केली. त्यासाठी त्यांनी जनाधिपतीय संरक्षण समिती या पक्षाची स्थापना केली (Janathipathya Samrakshana Samithy- JSS १९९४). या पक्षाचा अर्थ व विचार लोकशाही संरक्षण असा होता. सरतेशेवटी काँग्रेस पक्षाबरोबर आघाडीचे राजकारण त्यांनी केले. अशा चार टप्प्यातून त्यांचे राजकारण घडत गेले. त्यांनी या चार टप्प्यांमध्ये मार्क्सवादी विचारांना बळ दिले. तसेच स्त्रीवादी राजकारण घडविण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे त्याच्या मार्क्सवादी राजकारणात व स्त्रीवादी राजकारणात राजकीय

लेखिका पुणेस्थित श्री शाहू मंदिर महाविद्यालयात राज्यशास्त्राच्या प्राध्यापक आहेत.
ईमेल- pawarvaishali06@gmail.com

पेचप्रसंग उभे राहिले. या राजकीय पेचप्रसंगांचे स्वरूप गौरी अम्मांच्या जीवन चरित्राच्या आधारे मांडणे जास्त औचित्यपूर्ण ठरेल, कारण समकालीन कालखंडातदेखील मार्क्सवादी पक्ष व स्त्रीवादी राजकारण यांच्यामध्ये ताण-तणाव आहेत. हे ताण-तणाव समजून घेण्यास गौरी अम्मांचा राजकीय जीवन पट उपयुक्त ठरतो.

### गौरी अम्मा यांचे ध्येय व उद्दिष्ट्ये

गौरी अम्मा राजकीयदृष्ट्या कृतीप्रवण होत्या. तरीही त्या मुख्यमंत्रीपदाच्या सत्ता स्पर्धेत मागे का पडल्या हा महत्त्वाचा प्रश्न आहे. केरळमधील प्रथम निवडून आलेल्या कम्युनिस्ट सरकारच्या पहिल्या महिला मंत्री त्या होत्या. तसेच कॅबिनेट मंत्री, प्रदीर्घ काळ केरळ विधानसभेमध्ये निवडून आलेल्या सदस्य त्या होत्या. एवढेच नव्हे तर स्वातंत्र्य लढलेल्या शेवटच्या काळातल्या राजकीय नेत्यांपैकी त्या एक नेत्या होत्या. त्या इझवा समाजातील पहिली विधी क्षेत्रातील पदवीधर महिला होत्या. त्यांनी त्यांच्या काळात केरळला पुरोगामी कायदे दिले. त्यांचा मंत्रिमंडळातील सहभाग अभ्यासू होता. पितृसत्ताक व पुरुषसत्ताक राजकीय आखाड्यास स्वतःच्या विवेकानुसार समतावादी स्वरूप देण्याचा प्रयत्न त्यांनी केला होता. ही त्याच्या जीवनाची उद्दिष्ट्ये होती. स्वतःच्या आत्मबळावर विश्वास असणाऱ्या कृतिशील कॉम्रेड अशी त्यांची ओळख होती. विशेषतः स्त्रीवादी आणि कम्युनिस्ट विचारप्रणालीवर त्यांची अढळ श्रद्धा होती. त्यांना संपूर्ण देश कार्यकर्त्या, शेतकरी, मजूर, कामगार व महिला यांच्या हितासाठी कार्य करणाऱ्या आंदोलनकारी म्हणून ओळखतो (Jam Paul A., The Hindu, 11 May 2021). त्यांच्याकडे राजकीय क्षमता होती. तरीही त्या राजकीय सत्तेपासून उपेक्षित राहिल्या. ही कथा केवळ गौरी अम्मांची नव्हे तर भारतीय राजकारणातील पुरुषसत्ताक राजकारणाच्या विरोधातील संघर्षाची कथा आहे. गौरी अम्मा यांचा राजकीय संघर्ष चार प्रकारचा होता. एक, पुरुषसत्ते विरोधातील राजकीय संघर्ष. दोन, पुरुषप्रधान समाजव्यवस्थेच्या विरोधातील संघर्ष. तीन, पक्षांतर्गत सत्तेसाठीचा राजकीय संघर्ष. चार, समतेच्या राजकारणासाठीचा राजकीय संघर्ष. या चार प्रकारच्या संघर्षांना आर्थिक-सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमी होती. असे व्यापक उद्दिष्ट असूनही गौरी अम्मा यांचे राजकीय नेतृत्व सत्तेच्या स्पर्धेत निर्णायक का ठरू शकले नाही हा गंभीर प्रश्न आहे. याचे उत्तर साम्यवादी पक्षाच्या अंतर्गत धोरणात आणि गौरी अम्मा यांच्या सार्वजनिक जीवनात शोधावे लागेल. या अर्थाने कम्युनिस्ट पक्ष व गौरी अम्मा यांच्यातील परस्पर राजकीय सहसंबंध महत्त्वाचे ठरतात.

### गौरी अम्माची निवड- मार्क्सवादी विचार

गौरी अम्मा यांचा जन्म १४ जुलै १९१९ रोजी केरळमधील कलाथीपरंबिल या इझवा जमीनदार कुटुंबामध्ये झाला (Renu Ramanath, The News Minute, 11 May 2021). त्या क्रांतिकारी प्रेरणा शक्तीच्या मार्फत मार्क्सवादाशी जोडल्या गेल्या. या मुद्यांचे कार्यकारणसंबंध त्याच्या कुटुंबाशी संबंधित आहेत. इझवा या समाजातील प्रतिष्ठित, श्रीमंत, घरंदाज अशी त्यांच्या कुटुंबाची ओळख होती (Renu Ramanath, The News Minute, 11 May 2021). परंतु जातिव्यवस्थेच्या संदर्भात त्यांचे सामाजिक स्थान सत्ता, अधिकार, प्रतिष्ठा नाकारलेले होते. या सर्व गोष्टी सरंजामी पद्धतीच्या होत्या. गौरी अम्मा त्यांच्या आई-वडिलाची सातवी मुलगी होती (वडील कलाथीपरंबिलरमण व आई अरुमुरी परंबिलपार्वती). गौरी अम्मा यांना त्यांच्या वडीलांनी प्रेरणा दिली. आत्मविश्वास दिला. तसेच स्वची जाणीव करून दिली. प्रसंगी मदतदेखील केली. तरीही कुटुंबामध्ये पितृसत्ताक पद्धती होती, त्यांचा स्वभाव आक्रमक होता. त्यांनी तडजोड केली नाही. त्यांच्या स्वभावामुळे त्यांना जितके मित्र होते तितकेच राजकीय शत्रूही होते. या सर्व मुद्यांची चर्चा गौरी

अम्मा यांच्या आत्मकथेत आलेली आहे. तसेच सीपीएम पक्षाचे मुखपत्र देशाभिमानीमध्येही नोंदविली गेली आहे. गौरी अम्मांचे आरंभीचे आयुष्य खूप सोपे होते. कारण एका श्रीमंत कुटुंबात जन्मलेल्या त्या होत्या. त्यांच्याकडे जमीनदारी होती व त्यांना मोठे होत असताना कुटुंबाचा मोठा आधार मिळाला (Hamsadhwani Alagarsamy, K R Gouri Amma: A Feminist And Communist Legend, 18 May 2021, https:// feminisminiIndia.com). थोडक्यात जमीन ही त्यांची उत्पादन पद्धती होती. त्यामुळे त्यांचे सामाजिक संबंध कृषी क्षेत्राशी संलग्न पितृसत्ताक चौकटीमध्ये सुरुवातीस आले. अशा पितृसत्ताक पक्षाशी त्यांचे घराणे जोडले गेले होते. त्यांचे वडील काँग्रेस पक्षाचे समर्थक होते. गौरी अम्मा यांचा संबंध शिक्षणाच्या मार्फत आधुनिकतेशी सुरुवातीस आला. त्यांनी शिकून वकील व्हावे ही गौरी अम्मा यांच्या वडिलांची इच्छा होती. गौरी अम्मा यांनी त्यांचे शिक्षण शासकीय महाराजा कॉलेज आणि सेंट टेरेसा कॉलेज, एर्नाकुलम येथून घेतले होते. गव्हर्नमेंट लॉ कॉलेज, तिरुअनंतपुरम येथून त्यांनी विधी विद्याशाखेतील पदवी संपादित केली. असे आधुनिक शिक्षण घेणाऱ्या त्या एझावा समाजातील पहिल्या महिला होत्या (Hamsadhwani Alagarsamy). त्यांनी विधी विद्याशाखेमध्ये पदवी संपादित केली होती. विधी विद्याशाखेतील पदवीनंतर त्यांनी आपला वकिली व्यवसाय चेरथाला येथे सुरू केला. परंतु वडिलांच्या इच्छेनुसार वागण्याऐवजी गौरी अम्मा यांनी स्वतःच्या मनाचे ऐकले. येथे प्रथम पितृसत्तेच्या विरोधात गौरी अम्मा गेल्या. दुसरी महत्त्वाची घडामोड म्हणजे त्या कम्युनिस्ट पक्षात सामील झाल्या. न्यायदंडाधिकारी म्हणून नेमणूक असलेली प्रतिष्ठित नोकरीची ऑफर सोडली. गौरी अम्माची ही प्रमुख गुणवत्ता त्यांनी त्याच्या आयुष्यात कधीही सोडली नाही. गौरी अम्मांचा स्वतःवर आणि स्वतःच्या आत्मबळावर विश्वास होता. तशाच प्रकारच्या गोष्टींचे अनुसरण करण्याची त्यांची तीव्र इच्छाशक्ती होती. या सर्व तपशीलाचा मथितार्थ त्यांनी पितृसत्तेला विरोध केला. त्यांनी काँग्रेस परंपरेच्या राजकारणाला विरोध केला. तसेच त्यांनी आधुनिक नोकरीची परंपरा नाकारली. या तीन गोष्टी नाकारून त्यांनी मार्क्सवादी विचार परंपरा स्वीकारली होती. यांचें एक महत्त्वाचे कारण त्याच्या घरातील होते. गौरी अम्मा यांचे मोठे भाऊ के. आर. सुकुमारन हे त्यावेळी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाचे सदस्य होते. तसेच कामगार संघटनांचे प्रमुखदेखील होते. मार्क्सवादी विचारप्रणालीचा त्यांच्यावर प्रभाव होता. गौरी अम्मा यांना के. आर. सुकुमारन यांनीच मार्क्सवादी विचारप्रणालीची ओळख करून दिली. गौरी अम्मा यांच्यावर मार्क्सवादी विचारप्रणालीचा प्रभाव पडला होता. परंतु त्यांचे एकूण कुटुंब आणि त्याचा निर्णय यामध्ये सतत पितृसत्ताक व्यवस्था आणि मार्क्सवाद यामध्ये ताण-तणाव राहिलेले दिसतात.



झाला.

**निवडणुकीचे राजकारण**

गौरी अम्मा यांच्या राजकारणाचे खास वैशिष्ट्य म्हणजे निवडणुकीच्या राजकारणातील कृतिशील राजकीय सहभाग हे आहे. गौरी अम्मा या एकूण तेरा वेळा केरळ विधानसभेमध्ये निवडून गेल्या (Kurian Vinson, 11 May 2021). १९४८, १९५२, १९५४, १९५७, १९६०, १९६५, १९६७, १९७०, १९८०, १९८७, १९९१, १९९६ आणि २००१ अशा विधानसभा निवडणुकांमध्ये त्या आमदार म्हणून निवडून आल्या. विशेष म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये निवडणुकीचे राजकारण सुरू झाले होते. तेव्हाच गौरी अम्मा यांनी त्यात सहभाग घेतला. काँग्रेस पक्षाने निवडणुकीच्या राजकारणात कृतिशील सहभाग घेतला होता. त्याप्रमाणेच कम्युनिस्ट पक्षानेदेखील निवडणुकीय राजकारणामध्ये सहभाग घेतला. तेव्हा निवडणुकीय राजकारणाला गांधी, पटेल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर आकार देत होते (Raja Sekhar Vundru). हे एक भारतातील वास्तव होते. परंतु त्याबरोबरच कम्युनिस्ट चळवळदेखील निवडणुकीय राजकारणाला आकार देत होती. याचे उत्तम उदाहरण म्हणजे गौरी अम्मा हे दिसते.

१९४८मध्ये गौरी अम्मा यांनी त्रावणकोर मतदारसंघातून पहिली निवडणूक लढवली. इतर कम्युनिस्ट उमेदवारांप्रमाणेच गौरी अम्मा ती निवडणूक हरल्या. निवडणूक हरल्या हे महत्त्वाचे नसून कम्युनिस्ट पक्षाने संसदीय निवडणुकांचा मार्ग स्विकारला, हा मुद्दा मार्क्सवादातील बदलाशी संबंधित आहे. परंपरागत मार्क्सवाद उदारमतवादी लोकशाही राज्यसंस्थेवर टीका करतो परंतु गौरी अम्मा यांनी उदारमतवादी संसदीय लोकशाहीतील निवडणुकांचा मार्ग निवडला. त्या काळात, त्रावणकोर व ब्रिटिश सरकार यांनी कम्युनिस्टांचा छळ करण्याचा प्रयत्न केला आणि परिणामी गौरी अम्मा यांना तुरूंगात डांबले गेले. ब्रिटिश सरकार आणि त्रावणकोर संस्थानिक एका अर्थाने लोकशाही विरोधी कृती करित होते. कारण त्यांनी गौरी अम्मा यांच्या सार्वजनिक जीवनातील राजकीय कृतीला विरोध केला होता. ही परिस्थिती भारत स्वतंत्र झाल्यानंतरदेखील गौरी अम्माच्याबाबत बदलली नाही कारण त्यांना पोलिसांच्या अत्याचारांना सामोरे जावे लागले. गौरी अम्मा यांनी निवडणुकीसाठी कारागृह कक्षातून १९५२ साली प्रचार केला व ही निवडणूक त्यांनी जिंकली. दोन वर्षांनंतर त्यांनी आणखी एक निवडणूक जिंकली. गौरी अम्मा यांनी आपल्या आयुष्यात एकूण १६ निवडणुका लढविल्या. त्यापैकी गौरी अम्मा १३ वेळा निवडणूक जिंकल्या. सलग पन्नास वर्ष केरळच्या राजकारणामध्ये त्या लोकप्रतिनिधी म्हणून सर्वसामान्य लोकांमधून निवडून येत होत्या. यावरूनच गौरी अम्मा यांनी सर्वसामान्यांचे नेतृत्व केले तसेच त्यांनी महिलांचेदेखील नेतृत्व केल्याचे दिसते. ते अभिजनांचे नेतृत्व नव्हते असे म्हणता येते. पुरुषांची मक्तेदारी समजल्या जाणाऱ्या राजकारणामध्ये खुल्या स्पर्धेमध्ये सहभागी होऊन पन्नास वर्ष स्वतःची नेतृत्व क्षमता सिद्ध केलेल्या गौरी अम्मा या भारतीय राजकारणातील मैलाचा दगड ठरतात. कारण त्यांच्याखेरीज मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या संदर्भात इतर राज्यांमध्ये महिला नेतृत्वाची एवढी वाढ झालेली दिसत नाही. कोणतेही कवच नसताना किंवा कोणतीही झूल पांघरलेली नसतानादेखील सर्वसामान्यांच्या नेत्या म्हणून त्या निवडणुकीच्या रणांगणामध्ये योद्धा म्हणून उतरत होत्या आणि विजयश्री खेचून आणत होत्या. भारतीय राजकारणातील महिलांच्या सहभागाच्या दृष्टीने गौरी अम्मा या एक उच्च कोटीच्या आदर्श आहेत. भारतीय महिलांना विधानसभा व लोकसभा पातळीवर समान राजकीय भागीदारीसाठी आरक्षणाची नितांत गरज आहे असा सूर सर्वत्र असताना गौरी अम्मा यांनी मात्र कोणत्याही प्रकारचे आरक्षण नसताना खुल्या स्पर्धेमध्ये

उतरून आपली गुणवत्ता सिद्ध केलेली दिसते. राजकारणात महिला यशस्वी होऊ शकत नाहीत किंवा फार तर त्या केवळ एक वेळ निवडून येतात या मिथकाला गौरी अम्मा यांनी छेद दिलेला दिसतो. महिलांना राज्य व राष्ट्रीय पातळीवर निवडून येण्यासाठी कुटुंबाचा पाठिंबा अत्यावश्यक असतो किंवा ज्या महिला राजकीय पार्श्वभूमी आहे अशा कुटुंबातूनच निवडून येतात हे भारतीय व राज्य पातळीवरील मिथक गौरी अम्मा यांना लागू होत नाही. त्या स्वतःच्या राजकीय ताकदीवर पन्नास वर्ष राजकारणामध्ये सक्रिय राहिल्या. या घडामोडीमध्ये स्त्रीवादी राजकारणाची काही तत्त्वदृष्टी व्यक्त झालेली दिसते.

१९५२ आणि १९५४च्या केरळ विधानसभेच्या निवडणुकीमध्ये त्या त्रावणकोर-कोचीन या विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आल्या. १९५७च्या निवडणुकीमध्ये केरळमध्ये पहिल्यांदा कम्युनिस्ट पक्षाचे सरकार आले. जागतिक संदर्भात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे केरळमध्ये प्रथम कम्युनिस्ट पक्ष सत्तेवर आला. त्याचे सरकार स्थापन झाले. या कम्युनिस्ट पक्षाच्या पहिल्या सरकारमध्ये गौरी अम्मा पहिल्या महिला कॅबिनेट मंत्री झाल्या (Minister for Revenue, Excise and Devaswom). त्या महसुल खात्याच्या मंत्री होत्या (१९५७-१९५९). कम्युनिस्टांच्या याच मंत्रिमंडळामध्ये टी. व्ही. थॉमस हे कॉम्रेड कामगार व वाहतूक मंत्री होते. गौरी अम्मा यांचा विवाह टी. व्ही. थॉमस यांच्याबरोबर झाला. भारतातील ही पहिलीच वेळ होती की एकाच मंत्रिमंडळातील दोन मंत्र्यांचा परस्परांशी विवाह झालेला होता. गौरी अम्मा यांनी आपला जोडीदार निवडतानादेखील मार्क्सवादी विचारप्रणालीला प्राधान्य दिलेले दिसते. विषमता, शोषण, अन्यायकारी व्यवस्था यांच्या विरोधातील विचार मांडणारा कार्यकर्ता त्यांनी जोडीदार म्हणून निवडला. परंतु त्यांना पितृप्रधान संबंधांना सामोरे जावे लागले.

### कम्युनिस्ट पक्षातील अंतर्गत विसंगती

कम्युनिस्ट पक्षामध्ये वैचारिक पातळीवर विसंगती दिसू लागल्या होत्या. गौरी अम्मा यांच्या संदर्भात तसेच कम्युनिस्ट पक्षातील स्त्रीवादी राजकारणाच्या संदर्भात एक महत्त्वाची विसंगती उभी राहिली. कम्युनिस्ट पक्षात पितृसत्ता आणि पितृसत्ता विरोध असे राजकारण घडू लागले होते. याची अनेक उदाहरणे आहेत. परंतु गौरी अम्मा आणि देवकी पण्णीकर ही दोन महत्त्वाची उदाहरणे आहेत. ही दोन्ही उदाहरणे मुळापासून समजून घेतली तर कम्युनिस्ट पक्षातील लिंगभाव भेदभावाचे राजकारण समजून येते. केरळमधील कम्युनिस्ट पक्षांमध्ये फूट पडली आणि सीपीआय व सीपीआय एम अशा दोन गटांमध्ये केरळ कम्युनिस्ट पक्ष विभागला गेला. पक्षांमध्ये झालेली ही फूट वैचारिक पातळीवर होती. कम्युनिस्ट पक्षाच्या या फुटीचा परीणाम गौरी अम्मा यांच्या व्यक्तिगत आयुष्यावर झाला. गौरी अम्मा यांचे साथीदार टी. व्ही. थॉमस यांनी सीपीआय गटाची निवड केली तर गौरी अम्मा यांनी सीपीआय एम या गटाची निवड केल्याने या दोघांमध्येदेखील दरी निर्माण झाली. याचा परिणाम म्हणून गौरी अम्मा यांचे वैवाहिक आयुष्य संपुष्टात आले. वैचारिक मतभिन्नता हा घटक गौरी अम्मा यांचे वैवाहिक जीवन संपविणारा ठरला. परंतु आपल्या विचारांशी, मूल्यांशी असणारी बांधिलकी त्यांनी नाकारली नाही. हे फार मोठे धाडस गौरी अम्मा यांनी दाखविले.

केरळमधील बहुसंख्य कम्युनिस्ट पक्षाच्या महिला सदस्यांनी कम्युनिस्ट विचारांच्या असणाऱ्या जोडीदाराबरोबरच विवाह केलेले होते. कारण कॉम्रेड ही ओळख पुरोगामी होती. तसेच समतावादी म्हणून त्याच्याबद्दल आदर होता. पुरुषपणा नाही, हिंसक नाही, आक्रमक नाही अशीही धारणा होती. म्हणून कॉम्रेड कार्यकर्ता आपल्याला समानतेची, न्यायाची वागणूक देऊ शकतो असा विश्वास या महिला कार्यकर्त्यांना वाटत होता आणि म्हणून त्या विवाह

करताना कम्युनिस्ट कार्यकर्त्याला पहिली पसंती देत होत्या. परंतु कम्युनिस्ट कार्यकर्त्यांबरोबर विवाह केल्यानंतर अनेक महिला कार्यकर्त्यांना सार्वजनिक जीवन व कौटुंबिक जीवन या दोन पर्यायांमधून एका पर्यायाची निवड करावी लागली आणि बहुसंख्य महिला कार्यकर्त्यांनी सार्वजनिक जीवनाचा त्याग केला व कौटुंबिक जीवनाला प्राधान्य दिले. त्या केवळ आपल्या नवऱ्याच्या खंद्या पुरस्कर्त्या किंवा पाठिंबा देणाऱ्या म्हणूनच काम करत राहिल्या (Renu Ramanath, The News Minute, 11 May 2021). स्वतःच्या सार्वजनिक जीवनाला त्यांना आकार देता आला नाही किंवा जाणीवपूर्वक मार्ग त्यांना नाकारला गेला. याला गौरी अम्मा मात्र अपवाद आहेत. सार्वजनिक जीवन की खाजगी जीवन असा यक्ष प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला या वेळेला यांनी खासगी जीवनाला नकार देत सार्वजनिक जीवनाला प्राधान्य दिले. निश्चितच गौरी अम्मा यांची ही कृती चित्तवेधक होती परंतु त्यांना त्यासाठी आपल्या वैवाहिक जीवनाचा त्याग करावा लागलेला दिसतो.

सरदार के. एम. पण्णीकर यांची मुलगी देवकी या ऑक्सफर्ड विद्यापीठांमधून शिक्षण घेऊन आलेल्या होत्या. भारतात आल्यानंतर त्यांना कम्युनिस्ट विचारप्रणालीने प्रभावित केले. त्या केरळामध्ये कम्युनिस्ट पक्षामध्ये काम करू लागल्या. कम्युनिस्ट पक्षाचे काम करत असताना कॉम्रेड गोविंदन नायर यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या. विवाहानंतर त्या कम्युनिस्ट पक्षांमध्ये कार्यरत राहिल्या नाहीत. त्यांनी राजकीय कृतींमध्ये, सार्वजनिक जीवनामध्ये भाग घेणे सोडून दिले व कम्युनिस्ट नेत्याची पत्नी म्हणून केवळ त्या पाठिंबा देऊ लागल्या. त्यांनी त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा त्याग केला. पक्ष कार्यकर्त्यांबरोबर विवाह करूनदेखील त्यांना वैवाहिक जीवनासाठी आपल्या सार्वजनिक जीवनाचा त्याग करावा लागला. आपली अस्मिता राजकीय नेता ही असावी की एखाद्याची पत्नी ही असावी यामध्ये गौरी अम्मा यांनी आपली स्वतःची अस्मिता राजकीय नेता आहे व असणार आहे असा निर्णय घेतला व जीवनाच्या शेवटपर्यंत राजकीय नेता म्हणून असणारी आपली प्रतिमा जपत राहिल्या (Renu Ramanath, The News Minute, 11 May 2021). यावरून आपल्याला असे म्हणता येते की, कम्युनिस्ट पक्षातील गौरी अम्मा आणि कम्युनिस्ट पक्ष यांच्यामध्ये पितृसत्ताक पद्धतीवरून ताण-तणाव व पेचप्रसंग उभा राहिलेला दिसतो. महिला एक स्वतंत्र व्यक्ती आहेत, पुरुषांप्रमाणेच त्यांना देखील राजकीय हक्क आहेत तसेच पुरुषांप्रमाणे त्या सार्वजनिक जीवनामध्ये समान भागीदारी करू शकतात हा रशियन राज्यक्रांतीने दिलेला विचार केरळच्या कम्युनिस्टांकडून मात्र प्रत्यक्ष कृतीमध्ये उतरवताना राजकीय पेचप्रसंग उभे राहिलेले दिसतात. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे गौरी अम्मा व देवकी पण्णीकर यांच्या जीवन चरित्रात दिसते. ज्या महिला कम्युनिस्ट विचारप्रणालीने भारावून गेल्या व त्यांनी आपल्या संपन्न अशा करिअरचा त्याग केला त्या कम्युनिस्ट पक्षाच्या कार्यकर्ता झाल्या परंतु ते स्वातंत्र्य आणि समता विवाहानंतर मात्र त्यांना केवळ एक आदर्श (यूटोपिया) राहिला. प्रत्यक्ष व्यवहारांमध्ये मात्र सामान्य महिला प्रमाणे त्यांना आपले जीवन व्यतीत करावे लागले. म्हणजेच कुटुंबासाठी, आपले वैवाहिक जीवन टिकविण्यासाठी आपल्या सार्वजनिक जीवनाचा त्यांना त्याग करावा लागला. थोडक्यात पितृप्रधान व्यवस्थेचे वेगळ्या पद्धतीने नियंत्रण महिलांवर मार्क्सवादी पक्षाकडून घातले गेले.

### सत्तासंघर्ष

केरळच्या राजकारणामध्ये गौरी अम्मा पुढच्या किंवा भावी मुख्यमंत्री असे वातावरण तयार झाले होते. त्यासाठी १९८७च्या निवडणुकीमध्ये पक्षाच्या वतीने Keramthingum Kerala Naadu K R Gouri Bharicheedum (Kerala the land of Palm trees will

be ruled by K. R. Gouri) असा नारादेखील दिला गेला होता (Renu Ramanath, The News Minute, 11 May 2021). परंतु प्रत्यक्षात १९८७च्या निवडणुकीनंतर गौरी अम्मा यांना मुख्यमंत्री करण्याच्या ऐवजी पक्षाने ई. के. नयनार यांना मुख्यमंत्री केलेले दिसते. सीपीआय (एम) पक्षाच्या उच्च जातीय नेतृत्वाला कनिष्ठ जातीतील (इझवा) मुख्यमंत्री नको होता. तसेच सीपीआय (एम) पक्षाच्या पुरुष नेतृत्वाला महिला मुख्यमंत्री नको होती (N. P. Ashley) म्हणून गौरी अम्मा यांना मुख्यमंत्री या राजकीय सत्तेपासून सीपीआय (एम)च्या नेतृत्वाने बहिष्कृत केले. १९९०च्या सुरुवातीला व्ही. एस. अच्युतानंदन आणि गौरी अम्मा यांच्यातील वाद टोकाचा बनला. याचा परिणाम म्हणून गौरी अम्मा यांनी पक्ष विरोधी कारवाई केल्याचे सांगत त्यांना सीपीआय पक्षांमधून काढून टाकण्यात आले (S Anil Radhakrishnan, 11 May 2021). पक्षांतर्गत पक्ष नेतृत्वाकडून छळ करण्यात आला असा आरोप गौरी अम्मा यांनी केला होता (R.Krishnakumar, K.R.Gouri Amma:Death of a red star, Frontline, 4 June 2021). त्यानंतर गौरी अम्मा यांनी खचून न जाता किंवा राजकीय जीवनाचा त्याग न करता स्वतःच्या राजकीय जीवनाला आकार दिला. त्यांनी स्वतंत्र राजकीय पक्षाची स्थापना केली. भारतीय कम्युनिस्ट पक्षांनी त्यांना पक्षातून काढून टाकून त्यांना राजकीयदृष्ट्या बहिष्कृत केले असले तरीसुद्धा त्यांनी जनाधिपतीय संरक्षण समिती (जेएसएस) या राजकीय पक्षाची स्थापना केली (S Anil Radhakrishnan, 11 May 2021).

जनाधिपतीय संरक्षण समिती या पक्षाच्या माध्यमातून त्या राजकीयदृष्ट्या कृतिशील झाल्या. २७ वर्ष त्या कम्युनिस्ट पक्षांमध्ये कार्यरत होत्या. त्यांनी जरी नवीन राजकीय पक्ष स्थापन केला तरीही स्वबळावर केरळच्या राजकारणामध्ये तो सत्तेवर येऊ शकत नव्हता ही वास्तविक मर्यादा गौरी अम्मा यांना माहीत होती. त्यामुळे त्यांनी काँग्रेस पक्षाबरोबर आघाडी केली. २००१ ते २००६ या कालावधीमध्ये केरळमध्ये युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट आघाडीची सत्ता होती. त्याचे नेतृत्व काँग्रेस पक्षाकडे होते. या आघाडीमध्ये गौरी अम्मा यांचा जनाधिपतीय संरक्षण समिती हा पक्ष एक घटक पक्ष होता. केरळमध्ये या आघाडीच्या सरकारमध्ये गौरी अम्मा या कृषिमंत्री होत्या.

### समतावादी भूमिका

कम्युनिस्ट पक्षाने गौरी अम्मा यांना प्रतीकात्मक सत्तेपेक्षा जास्त सत्तेची भागीदारी दिली. तसेच गौरी अम्मा यांनी पक्षाच्या चौकटीत राजकीय सत्तेचा वापर केला. तरीही सरतेशेवटी गौरी अम्मा आणि कम्युनिस्ट पक्ष यांच्यामध्ये ताण-तणाव निर्माण झाला. यामुळे पक्षाची समतेची भूमिका व गौरी अम्मा यांची समतेची भूमिका यामध्ये मूलभूत फरक दिसतो. पक्षांची समतेची भूमिका विशिष्ट चौकटीशी संबंधित आहे तर गौरी अम्मा यांची समतेची संकल्पना लिंगभाव समतेशी संबंधित होती हा महत्त्वाचा फरक दिसतो. हा तणाव त्यांनी ज्या मंत्रिपदाचा कारभार केला. त्यामधून दिसून येतो. गौरी अम्मा यांनी महसूल मंत्री, कृषिमंत्री अशी विविध खाती वेगवेगळ्या मंत्रिमंडळामध्ये सांभाळली. एकूण सहा सरकारमध्ये त्यांनी मंत्री म्हणून कार्य केले. १९५७, १९६७, १९८०, १९८७, २००४ या काळात त्यांनी मंत्री म्हणून कार्य केले. १९५७च्या कम्युनिस्ट पक्षाच्या पहिल्या सरकारमध्ये त्या महसूलमंत्री होत्या. १९६७मध्ये दुसऱ्या नंबुद्रीपाद सरकारमध्ये त्या महसूलमंत्री होत्या. जानेवारी १९८० ते ऑक्टोबर १९८१ या कालखंडात ई. के नयनार यांच्या मंत्रिमंडळात त्यांनी कृषी आणि सामाजिक कल्याणमंत्री म्हणून कार्य केले. मार्च १९८७ ते जून १९९१ या कालखंडात ई. के नयनार यांच्या दुसऱ्या मंत्रिमंडळात त्यांनी उद्योग व सामाजिक कल्याण मंत्री तसेच दक्षता आणि न्याय प्रशासन मंत्री म्हणून कार्य केले. त्यांनी नयनार सरकारमध्ये उद्योगमंत्री म्हणून काम केले आणि देशातील पहिले

माहिती तंत्रज्ञान पार्क (टेक्नोपार्क) उभारण्यात मोलाची भूमिका बजावली (N.P. Ashley). २००४ ते २००६ या काळात ओमेन चंडी यांच्या मंत्रिमंडळात कृषी विद्यापीठ, पशुसंवर्धन खात्याच्या मंत्री म्हणून त्यांनी कार्य केले (Kurian Vinson, 2021). परंतु केवळ त्या नावापुरत्या त्या खात्याच्या मंत्री नव्हत्या तर त्यांनी ते खाते सांभाळत असताना त्यामध्ये मूलभूत व रचनात्मक असे बदल घडवून आणले, ज्या बदलांमुळे सामान्य गरीब, मजूर, कामगार, शेतकरी, महिला यांच्या जीवनामध्ये बदल घडून आला. राजकीय सत्ता ही सामान्यांच्या कल्याणासाठी असते यावर गौरी अम्मा यांचा विश्वास होता. त्यांनी राजकीय सत्ता ही समाजातील शेवटच्या माणसाचे म्हणजेच सामान्यातील सामान्य माणसाच्या शोषण मुक्तीसाठी वापरली, त्याचे दुःख दूर करण्यासाठी तिचा वापर केला. म्हणजेच राजकीय सत्ता लोककल्याणाचे एक महत्त्वाचे साधन आहे. त्यांनी हा विचार आयुष्यभर आपल्या कृतीमधून, निर्णयांमधून व्यक्त केलेला दिसतो. त्यांच्या कारकिर्दीमध्ये केरळ राज्यामध्ये मूलगामी क्रांतिकारी असे महत्त्वाचे कायदे केले गेले. थोडक्यात, गौरी अम्मांची राजकीय सत्तेतील भागीदारी पक्षाचे समर्थन करणारी होती तोपर्यंत पक्षाने ती योग्य मानली परंतु गौरी अम्मा यांनी एक स्त्री म्हणून सत्तेचा दावा केला तेव्हा तो अमान्य केला.

## मार्क्सवादी चौकटीतील धोरण निश्चिती

भारतीय राजकारणात कल्याणकारी चौकटीत धोरण निश्चिती १९४७ ते १९७० या काळात झाली. या काळावर पंडित नेहरूंच्या लोकशाही समाजवादी विचारांचा प्रभाव होता. त्यापेक्षा वेगळी मार्क्सवादी भूमिका गौरी अम्मा यांची होती. याची दोन उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत. १) नंबुद्रीपाद यांच्या सरकारमध्ये त्या महसूलमंत्री होत्या. क्रांतिकारक भू-सुधार विधेयकामध्ये त्यांनी मोलाची भूमिका बजावली (१९५७). कारण कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वात पहिल्या निवडून आलेल्या सरकारमधील गौरी अम्मा या संस्थापक सदस्य आणि महसूल मंत्री होत्या. गौरी अम्मा यांनी आयुष्यभर ज्या श्रमिक वर्गासाठी संघर्ष केला त्याच्या हिताच्या अनुषंगाने कायदे केले. केरळ राज्यात जमीनदार व कुळ यांच्यातील शोषणावर आधारलेल्या संबंधाचा अंत करणारा जमीन सुधारणा कायदा गौरी अम्मा यांच्या काळात केला गेला. या कायद्यांमुळे जमीन कुळांना (भाडेकरू) देण्यात आली. म्हणजेच हजारो वर्षांपासून जमीनीवर मालकी जमीनदार वर्गाची होती. ती या कायद्याने नष्ट करण्यात आली. कुळांच्या मालकी हक्कांच्या जमीनी झाल्या. या कायद्याने केरळमधील जमीनदार पद्धत किंवा सरंजामदारी पद्धत कायमची नष्ट करण्यात आली. एखाद्या कुटुंबाच्या मालकीची किती जमीन असेल या वर एक मर्यादा निश्चित केली गेली (N.P. Ashley). परंतु महिलांचे जमीन या उत्पादनाच्या साधनावर नियंत्रण प्रस्थापित झाले नाही. ही एक महत्त्वाची मर्यादा दिसते. २) त्यांनी भाडेकरू आणि शहरी गरिबांना जादा जागेवर हक्काची जमीन मिळवून द्यायची तरतूद केली (पहा तळटीप-१). सत्तरीच्या दशकानंतर हळूहळू कल्याणकारी चौकटीतील धोरण निश्चिती मागे पडू लागली. ऐंशीच्या दशकामध्ये धोरण निश्चितीची चौकट नव-उदारमतवादी म्हणून सुस्पष्टपणे उदयाला आली. नव्वदीच्या दशकापासून आर्थिक सुधारणांचे पर्व सुरू झाले. यापेक्षा गौरी अम्मा यांनी सार्वजनिक धोरण निश्चितीची चौकट वेगळी म्हणजेच मार्क्सवादी स्विकारली होती. त्यांनी धोरण निश्चितीमध्ये नाही रे वर्गाला मध्यवर्ती ठेवून धोरणांची आखणी केली. भ्रष्टाचार विरोधी कायदा, महिला आयोग कायदा असे महत्त्वपूर्ण कायदे केले गेले (पहा तळटीप-२). माकपशी त्यांचे मतभेद असूनही गौरी अम्मा मनाने कम्युनिस्ट राहिल्या. याचा परिणाम म्हणूनच, आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात गौरी अम्मा यांनी माकपशी जुळवून घेतले. गौरी अम्मा यांनी त्याचा पक्ष जन अधिपत्य संरक्षण समिती माकपमध्ये सामील होईल,

असे म्हटले. परंतु तसे कधी झाले नाही, तरी त्यांचा पक्ष मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला पाठिंबा देत राहील, अशी घोषणा केली. तसेच गौरी अम्मा यांनी कम्युनिस्ट नेतृत्वाचे समर्थन केले. २०१९मध्ये गौरी अम्मा यांच्या १००व्या वाढदिवशी माकपचे मुख्यमंत्री पिनारायी विजयन यांनी एक भव्य कार्यक्रम आयोजित केला. तसेच केरळ विधानसभेने त्या वर्षी गौरी अम्मांच्या वाढदिवशी सुट्टी जाहीर केली. १९९० साली आलेला मल्याळम भाषेतील चित्रपट 'लाल सलाम' हा तीन साथीदारांच्या जीवनावर आधारित होता. त्यापैकी एक गौरी अम्मा होत्या. २०११मध्ये गौरी अम्मा यांनी लिहलेल्या 'आत्मकथा' या त्यांच्या आत्मचरित्रासाठी केरळ साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला (Jam Paul A., The Hindu, 11 May 2021). गौरी अम्मा यांचा प्रभाव सांस्कृतिक घटकांवर पडलेला दिसतो. परंतु त्यांच्याकडे मुख्यमंत्री पातळीवरील अंतिम सत्ता दिली गेली नाही. हीदेखील एक वस्तुस्थिती आहे.

## समारोप

गौरी अम्मा या लढवय्या राजकीय नेत्या होत्या. सर्जनशील विधायक प्रेरणेने प्रेरित झालेल्या होत्या. शोषण संपविण्यासाठी, समतावादी समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले. केरळमध्ये कम्युनिस्ट चळवळ वाढविण्यामध्ये त्याचे महत्त्वाचे योगदान आहे. एक कुशल प्रशासक म्हणूनही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. सर्जनशील, अधुनिक, प्रगतीशील समाज निर्माण करण्यासंदर्भात गौरी अम्मा यांचे योगदान महत्त्वाचे आहे. मात्र पक्ष, समाज आणि गौरी अम्मा यांच्यामधील मुख्य संघर्ष पितृसत्तेचा होता. गौरी अम्मांसारखे नेतृत्व पितृसत्ताक समाजाशी झुंजत झुंजत काळाच्या पडद्याआड गेले. हा मार्क्सवादी राजकारणापुढील एक राजकीय सत्तासंघर्ष आहे. हा मुद्दा आजही औचित्यपूर्ण ठरतो. कारण पक्षावर व्यवस्थेचे पुरुषसत्ताक नियंत्रण आहे. परिणामी स्त्रीकडे अंतिम सत्ता देण्याचा विचार दुय्यम स्थानावर जातो. ●

---

### संदर्भसूची :


रसेल बर्ट्रांड, १९६६, राजकीय ध्येये, (भाषांतर- सुमन दाभोलकर), समाज प्रबोधन संस्था, पुणे.

Nossiter Y. J., 1982, Communism in Kerala A Study in Political Adaptation, Royal Institute of International Affairs, United Kingdom.

Jeffrey Robin, 1992, Politics, Women and Well-Being: How Kerala became Model, Palgrave Macmillan, New York.

K.R.Gowriaymma, 2010, Athmakatha.

Hamsadhwani Alagarsamy, K R Gouri Amma: A Feminist And Communist Legend, 18 May 2021, https://feminisminiIndia.com).

Anil Radhakrishnan, K.R.Gouri Amma, the best Chief Minister Kerala never had, The New Indian Express, 11 May 2021.

S Anil Radhakrishnan, Veteran Comunist leader K.R.Gouri Amma no more, The Hindu, 11 May 2021.

Kurian Vinson, Gouri Amma: An icon and inspiration for women in Kerala, www.thehindubusinessline.com, 11 May 2021.

N.P. Ashley, Gouri Amma Embodied Reformist Zeal, Political Vigour and Admivistrative Acumen, The Wire, Delhi.

Jam Paul A., I will raise my voice till my last breath for empowering women: K. R. Gouri Amma, the tallest leader of Kerala, The Hindu, 11 May 2021.

Renu Ramanath, K.R. Gouri Amma Passes away: A look at the life of a fierce, ferocious woman, The News Minute, 11 May 2021)

R. Krishnakumar, K.R. Gouri Amma: Death of a red star, Frontline, 4 June 2021.

Raja Sekhar Vundru, 2018, Ambedkar, Gandhi and Patel The making of India's electoral system, Bloomsbury Publishing India Pvt.Ltd.


तळटीप-१ : वेगवेगळे कायदे : Anti Eviction act of 1957 (The Kerala state of Eviction proceedings Act), Travancore-Cochin land act of 1957, Kerala land conservancy Act of 1957, Kerala compensation for tenants improvement Act of 1957, Kerala land Relinquishment Act of 1958, Kerala weight and measures Act of 1958, Kerala stampact of 1959, Kerala Janmikkaram payment Abolition Act of 1960, Kerala agrarian relations Act of 1960, Kerala revenue recovery Act of 1968).

तळटीप-२ Kerala Public Corruption (Investigation and Inquiries) Act of 1987 and Women's Commission Act of 1991.